# निवडणूक निर्णय अधिकारी

145 मिरा भाईंदर विधानसभा मतदार संघ

पत्ता :- प.पु. केशव भवन इमारत, तळमजला, मॅक्सेस मॉलच्या मागे,
अमृतवाणी मार्ग, अप्पर तहसिलदार कार्यालयाच्या खालील, भाईंदर (प.) ता.जि.ठाणे 401101

**स्विप पथक**

क्र./ निवडणूक/मि.भा.वि.स./कावि-१०३५/2024 दि. १९/10/2024

## // प्रेस नोट //

१४५ मिरा भाईंदर विधानसभा मतदार संघ, निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालया मार्फत मतदारांमध्ये जनजागृती करणेकामी दि.१९/१०/२०२४ रोजी सकाळी १०.०० वाजता आदर्श विदयामंदीर ते श्री राम मंदीर, राईगांव येथपर्यंत प्रभातफेरीचे आयोजन करण्यात आलेले होते. भारत निवडणूक आयोग १४५ मिरा भाईंदर विधानसभा मतदार संघात सदर प्रभात फेरीत मनपा शाळा क्रमांक २५ मराठी माध्य्म, मनपा शाळा क्र.२६ गुजराती माध्य्म, मनपा शाळा क्र.२२ मराठी माध्य्म, मनपा शाळा क्र.३३ हिंदी माध्यम् व आदर्श विदयामंदीर राई माध्यमिक विदयालय, आदर्श इंग्लिश हायस्कुल, राई या शाळांमध्ये मतदार साक्षरता मंच स्थापन करुन प्रभातफेरीचे आयोजन करण्यात आले. सदर प्रभात फेरीमध्ये विदयार्थ्यांनी विशेष उपस्थिती दर्शविली.

आदर्श विदयामंदीर राई माध्यमिक विभागातील स्काऊट गाईड विदयार्थ्यांचा विशेष समावेश होता. स्विप कार्यक्रमांतर्गत मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी मतदार जनजागृती करण्यात आली. आपले मत आपला आवाज, मतदार राजा जागा हो लोकशाहीचा धागा हो अशा घोषणा विदयार्थ्यांनी प्रभातफेरीमध्ये दिल्या. मतदार प्रतिज्ञा घेऊन प्रभात फेरीची सांगता करण्यात आली.

Scanned with CamScanner